MHAH180015942015

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.४९०/२०१५ मधील</u>**
**<u>आदेश नि.क्र.२२</u>**

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२) वादीच्या कथनानुसार वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूध्द मिळकतीची फाळणी मोजणी होवुन बांध बंदिस्ती निश्चित होवुन अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी व निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे.

३) सदर दाव्यामध्ये नि.क्र. ७ च्या अर्जावर कोर्ट किमशनचा हुकूम होवुन सदर प्रकरण मोजणीकामी भुमी अभिलेख कार्यालयाकडे दाखल केले असता त्यांनी वादी प्रतिवादींच्या मिळकती दि. १८/०४/२०१७ रोजी मो.र.नं. ७०३/२०१७ अन्वये जागेवर जावुन मोजणी करून तसा अहवाल व नकाशा मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ११ यांचे गट नं. २६९ ची मोजणी केली असता त्यांचे अतिक्रमीत क्षेत्र ० हे ३९ आर हे उत्तरेस गट नं. २६९/१ चे लाभधारक यांचेकडे दाखविलेले आहे. त्यांना या दाव्यात प्रतिवादीपणात सामील करणे गरजेचे आहे. म्हणुन वादीने प्रस्तुत अर्जात दावा कलम १ मध्ये प्रतिवादी या सदरात ''प्रतिवादी क्र. १२ भगवान तुळशीराम म्हसे, वय-६०, धंदा-शेती, प्रतिवादी क्र. १३ शंकर भगवान म्हसे, वय-३५, धंदा-शेती, प्रतिवादी क्र. १४ सुभद्राबाई रोहीदास थोरात, वय-७०, धंदा घरकाम, प्रतिवादी क्र. १५ आप्पासाहेब भानुदास म्हसे,

वय–३५, धंदा–शेती व प्रतिवादी क्र. १६ दत्तात्रय विश्वनाथ म्हसे, वय–३५, धंदा–शेती, सर्व रा. कोंढवड, ता. राहुरी, जि. अहमदनगर'' तसेच नि.क्र. १ वर दावा कलम ३ चे शेवटी ''उपअधिक्षक भुमी अभिलेख, राहुरी यांनी वादी प्रतिवादींच्या मिळकती दि. १८/०४/२०१७ रोजी मो.र.नं. ७०३/२०१७ अन्वये जागेवर जावुन मोजणी केली असता नकाशामध्ये लाल रंगाने ० हे ११ आर अतिक्रमीत क्षेत्र तसेच पिवळया रंगाने ० हे १७ आर अतिक्रमीत क्षेत्र तसेच हिरव्या रंगाने ० हे ०४ आर अतिक्रमीत क्षेत्र तसेच नारंगी रंगाने ० हे ०७ आर हे अतिक्रमीत क्षेत्र प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचेकडे दाखविलेले आहे. असे एकंदर ० हे ३९ आर हे अतिक्रमीत क्षेत्र प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचेकडे असल्याचे दाखविलेले आहे'' व पान नं. ४ वर दावा कलम ७ब नंतर ७ब१ मध्ये ''मो.र.नं. ७०३/२०१७ अन्वये जागेवर जावुन मोजणी केली असता ० हे ३९ आर हे अतिक्रमीत क्षेत्र प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचेकडे असल्याचे दाखविलेले आहे. तरी ते अतिक्रमीत ० हे ३९ आर क्षेत्र वादीचे ताब्यात देण्याचा मे. कोर्टाचा हुकूम व्हावा'' याप्रमाणे अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे दुरूस्ती करण्याची विनंती केली आहे.

**४)** सदरची दुरूस्ती करणे न्यायाचे कामी व वादीचे हिताचे दृष्टीने गरजेचे आहे. त्या अनुषंगाने वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्यात न्यायनिवाडा करण्यास कोणतीही कायदेशीर अडचण येणार नाही, सबब, वादीने दावा दुरूस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

**५)** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांनी वादींचा अर्ज योग्य ते कॉस्टा भरून घेवुन मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**६)** वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**७)** अर्ज व म्हणण्याचे अवलोकन करता प्रस्तावित दुरूस्ती ही औपचारिक स्वरूपाची असल्याने दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल संभवत नाही. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर चालविण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणात अदयापपर्यंत मुद्दे गठीत झालेले नाही. प्रस्तावित दुरूस्ती ही दावा सुरू असताना झालेल्या बदलामुळे करणे गरजेचे आहे. त्यामुळे, वर नमुद केलेल्या कारणामुळे दाव्याचे स्वरूप पाहता प्रस्तावित दुरूस्ती गरजेची वाटते.

**८)** वर नमुद केलेली कारणमिमांसा विचारात घेता, सदरचे विशोधन दाव्याचे अंतिम निर्णयासाठी इष्ट व आवश्यक असल्याने न्यायाचे हेतुस्तव पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज १०० रूपयांची कॉस्टस प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाचे आत दुरूस्ती करावी व त्याच कालावधीत दाव्याची विशोधित प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**राहुरी**
**दिनांक :- २१.०१.२०२३**

**(सौ. आर. एस. तापडीया)**
**सह दिवाणी न्यायाधीश,**
**क.स्तर, राहुरी**